जादूची टोपी

लेखक: फ्लाविया वीद्न आणि लिसा वीद्न गिल्बर्ट
चित्रकार : फ्लाविया वीद्न



जादूची टोपी

एका गावात, आई आणि तिचा मुलगा असे दोघेच रहात होते. जरी ते गरीब होते तरी त्यांच्या एकमेकांवरच्या प्रेमाने ते खूप श्रीमंत होते. एका थंडीच्या महिन्यात आईने तिच्या मुलासाठी एक गरम टोपी बनवली. प्रत्येक वेळी ती टोपी घातल्यावर त्या मुलाला विशेष वाटायचे, त्याला वाटायचे की यात काहीतरी जादू आहे.


जादूच्या टोपीची बातमी चटकन् गावात सगळीकडे पसरली.   मुलगा जिथे जाईल तिथे लोक त्याला टोपीच्या बदल्यात त्यांच्या जवळच्या गोष्टी देऊ करीत. मुलगा त्या सगळ्या गोष्टी नाकारून म्हणे, “माफ करा, मी कोणत्याही गोष्टीच्या बदल्यात ही टोपी देऊ शकत   नाही , हे बघा, ही टोपी माझ्या आईने माझ्यासाठी बनवली आहे.” टोपी मुलाकडून काढून घेऊन अनेक लोकांनी घालून बघितली. पण त्यांना काहीच फरक पडला नाही त्यामुळे त्यांनी मुलाला खोटारडा ठरवलं. मुलगा खूप   दु:खी   झाला. एका हुशार म्हाता-रा बाईने मात्र त्याला एक गोष्ट सांगितली जी त्याला आधीच माहीत होती.   ती म्हणाली की तो अनुभवत असलेली जादू त्या टोपीची नाही, तर ज्या प्रेमाने ती तयार केली त्या ‘प्रेमाची’ आहे.

चंद्राच्या दुस-या बाजूस राहत असलेल्या कालपुरुषाने,घरातून, त्याच्या अत्यंत विश्वासू अशा आठ कथाकथनकारांना सर्व मुलांना आशेचा संदेश देण्यासाठी बोलावले. त्यांचे ध्येय जगात जादूच्या अशा गोष्टी पसरविणे होते की ज्या आपल्याला आठवण करून देतील की आपण एक कुटुंब आहोत. एकाच जगात आहोत आणि आपली हृदये एकच भाषा बोलतात आपण कुठे राहतो, कसे दिसतो किंवा कसे बोलतो याने काहीच फरक पडत नाही. आपल्या प्रत्येकाला प्रेम मिळवण्याचा, पालनपोषण करून घेण्याचा आणि आपल्या स्वप्नांपर्यंत पोहचण्याचा अधिकार आहे. ही त्यातलीच एक गोष्ट आहे. ती मनापासून ऐका आणि त्यातील जादू अनुभवा.


या गोष्टीतल्या मुलाचे नाव आहे **महेश** .

जादूची टोपी






फार फार वर्षांपूर्वी एका गावात महेश आणि त्याची आई रहात होते. त्यांची छोटीशी झोपडी गावापासून लांब जंगलाजवळ होती. जरी ते गरीब असले तरी त्यांचे घर प्रेमाच्या उबेने ऊबदार झालेले होते; ते घर प्रेमाने भारलेले होते.



महेशची आई दिवसभर खूप कष्ट करायची. गावातील श्रीमंत लोकांचे शिवणकाम, त्यांच्या घरातील समारंभासाठीचा स्वयंपाक, आणि त्यांनी सांगितलेले कोणतेही अवघड काम करायची.



रात्री तिचे सगळे काम संपले की ती आणि महेश शेकोटीजवळ सगळा वेळ एकमेकांसोबत गप्पा गोष्टी करत, भविष्याची स्वप्ने पाहात आनंदाने वेळ घालवत. हा त्या दोघांचा अनमोल असा ठेवा होता. महेशकडे त्याच्या इतर मित्रांसारखी महागडी खेळणी किंवा इतर गोष्टी नव्हत्या पण त्याने कधीही तक्रार केली नाही. त्याला जास्त काही नकोच होते, कारण त्याच्याकडे खूप मौल्यवान वेगळे असे काहीतरी होते.



एका कडाक्याच्या थंडीच्या महिन्यात,एके दिवशी महेशच्या आईने जवळ असलेल्या उरल्यासुरल्या धाग्यांचा वापर करून महेशसाठी एक टोपी विणली. व त्याला सांगितले, “ही टोपी तुला जंगलात लाकूड तोडायला जाताना ऊब देईल. ही खूप भपकेदार नाही पण मी ती खूप प्रेमाने, मनापासून तुझ्यासाठी विणली आहे.”


ती टोपी पाहून महेश खूप खूष झाला. त्याने पुन्हा पुन्हा आईचे आभार मानले, कारण त्याला माहीत होते की टोपीची गरज आईला जास्त आहे, तरीही तिने ती स्वतःसाठी न विणता माझ्यासाठी विणली आहे. त्याने अत्यंत कृतज्ञतापूर्वक ती टोपी घेतली, कारण यामुळे आईला आनंद होईल हे त्याला माहीत होते. त्याचेसुद्धा आईवर खूप प्रेम होते.



प्रत्येक वेळी टोपी डोक्यावर घातल्यावर त्याच्यात खूप अद्भुत आणि अप्रतिम अशी जाणीव निर्माण व्हायची. त्याला आतून खूप वेगळे आणि आनंदी वाटायचे. त्यामुळे त्याला वाटायचे की ती टोपी जादूची आहे. त्याने उत्साहाने सगळ्यांना तसे सांगायला सुरवात केली. आणि काय! त्याच्या टोपीची चर्चा सगळ्या गावात सुरु झाली.

एक दिवस महेशने जंगलात फिरायला जायचे ठरवले. त्याला वाटेत गावातला एक शेतकरी दिसला ज्याने महेशच्या टोपीबद्दल आधीच खूप ऐकले होते. जादूच्या टोपीची बातमी याआधीच वणव्यासारखी सगळ्या गावात पसरली होती. तो महेशला म्हणाला, “ हे बघ मुला, तुझ्या टोपीच्या बदल्यात मी तुला माझा गरम सदरा देतो. सध्या खूप थंडी पडली आहे, अशावेळी टोपीपेक्षा तुला तोच फार उपयोगी पडेल. तुझी टोपी तू मला दे.” महेशला सद-याची खरं तर खूप गरज होती. पण महेश म्हणाला,“नको, आभारी आहे काका! मी माझी टोपी कशाच्याही बदल्यात देणार नाही. लक्षात घ्या, अहो, माझ्या आईने ती माझ्यासाठी बनवली आहे.”





अचानक त्या शेतकऱ्याने महेशच्या डोक्यावरची टोपी खेचून घेतली आणि ती डोक्यावर घालत तो पळायला लागला.

महेश सुद्धा त्याच्या मागे पळायला लागला. मध्येच तो शेतकरी थांबला आणि ती टोपी महेशकडे फेकत म्हणाला,“ह्या टोपीमध्ये काहीही जादू नाही. मला ती

टोपी घातल्यावर जरासुद्धा वेगळे वाटले नाही. मूर्ख मुला! अगदी साधी आणि जुनी टोपी आहे ती”.

महेशने पटकन ती टोपी पकडली आणि परत डोक्यावर घातली. परत त्याला खूप अद्भुत आणि आनंदी वाटायला लागले.

त्याला माहीत होते की टोपीची जादू गेली नाही, ती तशीच आहे. त्याने स्वतःशी विचार केला नक्कीच त्या शेतकऱ्याला काहीच कळत नाही. त्याने मोठ्ठी चूक केली आहे. माझी टोपी जादूचीच आहे.







तो तसाच जंगलातून चालत राहिला. अंधार पडता पडता त्याच्या लक्षात आले की तो राजाच्या महालापाशी पोचला आहे. त्याने पाहिले की अनेक लोक सुंदर तयार होऊन आणि छान छान कपडे घालून राजवाड्याच्या पायऱ्या चढत आहेत कारण राजवाड्यात कोणतातरी समारंभ आहे.





एका पहारेकऱ्याने महेशला पाहिले. त्याला महेशच्या टोपीबद्दल माहीत होते म्हणून त्याने महेशला पटकन् राजवाड्यात प्रवेश दिला. आत आल्यावर राजाने महेशला पाहिले. राजाचे लक्ष त्याच्या टोपीकडे गेले. महेशजवळ येत राजा म्हणाला, “महेश, मी माझा सोन्याचा मुकुट तुला देतो. त्याच्या बदल्यात मला तुझी जादूची टोपी दे.”

महेश म्हणाला, “नाही महाराज, क्षमा असावी. मी कोणत्याच गोष्टीच्या बदल्यात टोपी देऊ शकत नाही; कारण ती माझ्या आईने माझ्यासाठी तयार केली आहे.”






राजा म्हणाला, “ठीक आहे. तुला माझ्या मुकुटाच्या बदल्यात टोपी द्यायची नाही, तर मग तू राजवाड्यातच रहा, म्हणजे मला हवी तेव्हा टोपी घालता येईल.” पण महेशने थांबण्यास नकार दिला व तो राजवाड्यातून जाऊ लागला. राजाने त्याला थांबवले. राजाला तातडीने टोपी हवीच होती. राजाच तो, त्याला हवी ती कोणतीही गोष्ट काहीही करून मिळवण्याची सवय होती. त्याने शिपायाला आज्ञा दिली, “घ्या रे त्याची टोपी काढून!”

शिपायाने टोपी काढून घेतली व राजाजवळ दिली. राजाने घाई घाईने ती टोपी डोक्यावर घातली. पण राजाला काहीच वेगळे वाटले नाही किंवा काहीच जादू झाली नाही.

वैतागलेला आणि चिडलेला राजा म्हणाला, “ तू खोटारडा आणि लबाड आहेस!” आणि त्याने महेशला त्याच्या टोपीसकट राजवाड्याबाहेर काढायला शिपायाला सांगितले.



रडत रडत महेश जंगलातून आपल्या घराकडे निघाला. त्याला खूप वाईट वाटत होते. तो गोंधळला होता. त्याला समजत नव्हते कोणालाच या टोपीतली जादू का अनुभवता येत नाही? सगळे जण त्याच्याशी इतक्या निर्दयपणे का वागत आहेत?



जंगलातून परत येत असताना एक वृद्ध बाई त्याच्या जवळ आली. तिने त्याला प्रेमाने विचारले, “काय रे मुला, असा का रडतो आहेस?” आधी महेशला वाटले की ही बाई पण आपली टोपी खेचून घेते की काय; पण तिचे आपुलकीचे बोलणे ऐकून महेशने आपली सगळी गोष्ट त्या आजीबाईंना सांगितली.

आजीबाईंनी महेशचे म्हणणे शांतपणे ऐकले, समजून घेतले. त्याचा हात हातात घेऊन त्या कोमलपणे हसल्या आणि म्हणाल्या, “अरे, ती टोपी खरोखरंच जादूचीच आहे.

पण ती जादू फक्त तुझ्या एकट्या पुरतीच आहे. ती जादू म्हणजे छान भावना आहे, आईचं तुझ्यावरचं प्रेम आहे. फक्त प्रेम! अंतःकरणापासून केलं जाणारं आणि तशाच प्रेमळ हृदयानी ओळखलं जाणारं प्रेम!”





महेशला हे ऐकून आईची आठवण झाली. त्याच्या चेहऱ्यावर हसू आले, कारण त्याला आजीबाईंचे म्हणणे पटले. त्याचे हृदय प्रेमाने भरून आले व त्याला त्याच्या आईजवळ जाण्याची ओढ लागली. आजीबाईंचे आभार मानून आणि टोपी हातात घट्ट पकडून तो घराकडे धावत सुटला.



सरतेशेवटी जसा तो त्याच्या
झोपडीजवळ पोहचला, तसे
त्याने पाहिले की त्याची आई
आणि शेजारचा एक मुलगा
बाहेर उभे होते. त्याने आईला
घट्ट मिठी मारली आणि
घडलेली सर्व हकीकत आईला
सांगितली. आईच्या चेहऱ्यावर
सुद्धा त्या आजीबाई सारखे मंद
स्मित उमटले. पण
त्याच्या शेजारच्या मुलाला
मात्र काहीच कळत नव्हते.





उलट तो मुलगा म्हणाला, “तू मूर्ख आहेस! अगदीच मूर्ख आहेस! अरे वेड्या, ती साधी, जुनी टोपी राजाच्या मुकुटाच्या बदल्यात देऊन टाकून तू आयुष्यभराचा श्रीमंत झाला असतास, किंवा राजाबरोबर कायम राजवाड्यातच राहिला असतास तर अशा हजार टोप्या खरेदी केल्या असत्यास. तुला जगभरातील सर्व खेळणी पण मिळाली असती.”

महेशने दोन मिनिटे त्या मुलाकडे पाहिले आणि तो म्हणाला, “तुला कळत नाही आहे; ही टोपी तयार करताना माझ्या आईचे प्रेम पण त्यात गुंफले गेले आहे. ते फक्त माझ्यासाठीच आहे; त्यामुळेच ती घातल्यावर मला वेगळेच वाटते. खूप आनंद होतो मला. इतर लोकांना ते कसं कळणार? मला ही जी जादू जाणवते ती इतर कोणाला कशी जाणवणार?”

पुढे महेश म्हणाला, “मी ही टोपी कधीच कोणत्याच गोष्टीच्या बदल्यात विकणार नाही. आणि तुला समजत नाही का? मला श्रीमंत असण्याची गरज नाही किंवा महालात राहण्याची पण गरज नाही. माझ्याकडे जगातील कोणत्याही गोष्टीपेक्षा मोठ्ठी गोष्ट आहे. माझ्याकडे माझ्यावर प्रेम करणारी आई आहे.......आणि त्यामुळेच मी राजापेक्षा पण जास्त श्रीमंत आहे.”



तो मुलगा घरी निघून गेल्यावर महेशने आईला मिठी मारली आणि आईने त्याची प्रेमाने पापी घेतली. दोघे एकमेकांचा हात धरून घरात गेले. महेश आणि त्याची आईच्या लक्षात पुन्हा एक गोष्ट आली जी त्यांना आधीपासूनच उमजली होती. प्रेम देणे, हीच एक सर्वात मोठी जादू आहे. त्या रात्री गप्पा गोष्टी करण्यासाठी ती दोघे अंगणात बसली तेव्हा महेशची टोपी सोन्यासारखी चमकत होती.

